27-02-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/26/2025 11:42 PM Page 1

निवडक

खोला पंचायत ग्रामविकास समिती स्थापन करण्याची ग्रामस्थांकडून मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद,दि. २६ : खोला पंचायत क्षेत्रात विकास कामांना चालना देण्यासाठी स्थानिक आमदार व अन्य खात्यांच्या अधिका–यांसह ग्रामविकास समिती स्थापन करण्याची ग्रामस्थांकडून खोला ग्रामसभेत मागणी करण्यात आली आहे. सरपंच प्रियांका वेळीप यांच्या अध्यक्षते खाली ही ग्रामसभा घेण्यात आली होती. यावेळी पंचसदस्य पंढरी उर्फ बाबू प्रभुदेसाई, कृष्णा वेळीप, कृपेश वेळीप प्रज्ञा कामत, प्रियांका प्रसाद वेळीप, पंचायत सचिव दामोदर काणकोणकर आणि गटविकास अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी गोविंद जितोणकर व अन्य उपस्थित होते. खोला पंचायत क्षेत्रातील वाढती अपघात प्रवण क्षेत्रे या संबंधी चिंता व्यक्त करून वाढती कचरा समस्या आणि कमकुवत ठरलेली स्वच्छता मोहिम, जुन्या बस थांब्यांच्या दुरुस्तीकडे झालेले दुर्लक्ष, साळेरी पुलाकाठावर सुरु असलेली मासेविक्री आणि त्यामुळे होणारी वाहतूकीची कोंडी, कयांकींग जलसफारी करता होणारी स्पर्धा, साळेरी कमकुवत झालेला पुल आदी विषयावरून ग्रामसभेत जोरदार चर्चा करण्यात आली. खोला पंचायत क्षेत्रातील गंवळ–खोल हारस्कूल व तसेच अन्य महत्वाच्या व धोक्याया ठिकाणी गतिरोधक बसविण्यात यावेत, काब– दे–राम या ठिकाणी वास्तव्यास असलेले कामगार व पर्यटकांकडून होत असलेली अरेरावी यावर कारवाई करण्याची मागणी तसेच खोला येथील काही घरात परवाना नसताना कामगारांचे वास्तव्य, यावर कारवाई करण्याची मागणी सुनील पागी, प्रशांत देविदास, राजेश वेळीप, रुजारियो गोईश, एलजिओ फेर्नांडीस व अन्य ग्रामस्थांनी केली. खोल पंचायतीत शेळपे पाणी प्रकल्प आणि पारयेकट्टा कूपनलिकेच्या माध्यमातून पाणी पुरवठा होत असतो, या प्रकल्पाची तपासणी करण्यात यावी अशी जोरदार मागणी सुनील पागी व अन्य ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

मासळी विक्री त्वरित बंद करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

काणकोण, दि. २६ : खोला पंचायत क्षेत्रात असलेल्या साळेरी पुलाच्या दोन्ही बाजूला बसून मासळी विक्री केली जात असते. यामुळे येथे कधीही अपघात होण्याची शक्यता खोला पंचायतीच्या गामसभेत नागरिकांनी व्यक्त केली. हा प्रकार पंचायतीने त्वरित बंद करण्याची मागणी नागरिकांनी केली.
या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच प्रियांका पवित्र वेळीप होत्या. यावेळी पंच सदस्य पंढरी प्रभूदेसाई, कृष्णा वेळीप, कृपेश वेळीप, प्रज्ञा कामत, प्रियांका प्रसाद वेळीप, पंचायत सचिव दामोदर काणकोणकर आणि गटविकास कार्यालयातील प्रतिनिधी गोविंद जितोणकर उपस्थित होते.
या ग्रामसभेत पंचायत क्षेत्रातील अपघात प्रवण क्षेत्रे, वाढत असलेली कचरा समस्या आणि कमकुवत ठरलेली स्वच्छता मोहीम, जुन्या बस थांब्याच्या दुरुस्तीकडे झालेले दुर्लक्ष, साळेरी पूल कमकुवत झाल्यामुळे होत असलेली वाहतुकीची कोंडी यांसारख्या अनेक मुधांवरून पंचायतीची ग्रामसभा गाजली. खोला पंचायतीमध्ये शेळप पाणीपुरवठा प्रकल्प आणि पारयेकटा कूपनलिकेच्या माध्यमातून पाणी पुरवठा होत असतो. या प्रकल्पाची तपासणी करण्याची मागणी यावेळी सुनील पागी या नागरिकांनी केली. त्याच प्रमाणे विकास कामाना चालना देण्यासाठी स्थानिक आमदार व अन्य खात्यांच्या अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन ग्रामविकास समितीची स्थापना करण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली. गवळ हायस्कूल, त्याचप्रमाणे अन्य महत्त्वाच्या व धोक्याच्या ठिकाणी गतिरोधक बसविण्यात यावेत, काब–दि राम या ठिकाणी वास्तव्याला असलेले काही कामगार तसेच पर्यटक देखील मधधुंद अवस्थेत वावरतात. तसेच काही घरांमध्ये परवाना नसताना १० ते१५ कामगार वास्तव्य करून आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी एलजिओ फर्नांडिस, सुनील पागी, प्रशांत देविदास, राजेश वेळीप, रोझारियो गोयस व इतर ग्रामस्थांनी केली.

हरमल क्षेत्रात सुसज्ज पंचायत घर, मासळी मार्केट प्रकल्प

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. २६ : येथील पंचायत क्षेत्रातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपण पावले उचलली असून,अपुऱ्या जागेत असलेले पंचायत घर सुसज्ज करण्यासाठी प्रक्रिया सुरू केली असून लवकरच फलद्रूप होईल, असे मांद्रे मतदारसंघाचे आमदार तथा गोवा हाउसिंग बोर्डाचे चेअरमन जीत आरोलकर यांनी व्यक्त केले. हरमल पर्यटन स्थळ असल्याने ह्या पंचायत क्षेत्रात आवश्यक सुविधांच्या बाबतीत आपण नियोजनबध्द प्रयत्न करीत असल्याचे सांगितले. पंचायत घर एकदम तोकड्या व अपुऱ्या जागेत आहे.पंच सदस्यांना बैठक घेण्यास जागेची वानवा आहे. शिवाय कामानिमित्त येणाऱ्या ग्रामस्थांना खूपच अडचणीचे होत असल्याने, आपण पंचायत मंडळाच्या सहकार्याने सरकारी विद्यालय असलेल्या जागेत प्रशस्त कार्यालय, सरपंच, तलाठी, पंचायत सचिव, ग्रामसेवक व अन्य अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र केबीन, पहिल्या मजल्यावर सभागृह व अन्य सोयी सुविधा उपलब्ध करण्याचा आराखडा तयार केल्याची माहिती आमदार जीत आरोलकर यांनी दिली.
या गावात प्रसिद्ध किनारपट्टी व मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे. त्या मासेमारीतील उत्पादन विक्रीचे केंद्र म्हणजे मासळी मार्केट. हरमलची ताजी मासळी प्रसिद्ध असल्याने तालुक्यातील ग्राहक ह्या भागात मासे खरेदीसाठी येत असतात शिवाय नजीकच्या आरोंदा, शिरोडा,मालवण भागातील मासे विक्रेते येत असतात.त्यांना बसण्यासाठी योग्य जागा व ग्राहकांना योग्य पदपथ नसल्याने प्रशस्त मार्केट उभारले जाईल,व त्याचे भूमिपूजन लवकरच होणार असल्याचे आमदार जीत आरोलकर यांनी सांगितले. किनारी भागात वाहनाची पार्किंग व प्रसाधन कक्ष उभारण्यासाठी जागेची कमतरता आहे.दोन वेळा पायाभरणी झाली,त्याबाबत भाष्य करणार नाही.मात्र पर्यटन स्थळी सुविधा उपलब्ध केल्यास पर्यटन व्यवसायात वृध्दी होणार व त्याचा फायदा स्थानिक व्यवसायिकांना होईल.त्यासाठी प्रकल्प मंजुरीसाठी आपले प्रयत्न चालू आहेत व लवकरच यश मिळण्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले.
दरम्यान,चोपडे केरी रस्त्याचे काम करण्यापूर्वी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी जलवाहिनी व या पावसाळ्यानंतर रस्त्याचे डांबरीकरण काम सुरू होईल. पाणी पुरवठा खात्याच्या वारंवार रस्ते फोडण्याच्या कामामुळे रस्ते खराब होत असतात,त्यामुळे दोन्ही बाजूंनी जलवाहिनी असेल.वाहन चालक व नागरिकांनी थोडी कळ सोसावी, येत्या दोन वर्षात, मांद्रेत निश्चितच खूपच बदल दिसेल असा आत्मविश्वास आमदार जीत आरोलकर यांनी व्यक्त केला. यावेळी सरपंच संतान फर्नांडिस,उपसरपंच अनुपमा मयेकर, पंच सुशांत गावडे आदी उपस्थित होते.

भक्ती, नाट्य आणि अनपेक्षित घटनांचा महासोहळा

▶ 'महाकुंभ २०२५'ची सांगता : ६५ कोटींहून अधिक भाविकांनी घेतली भेट

प्रयागराज, दि. २६ :

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ २०२५ ची सांगता महाशिवरात्रीच्या अंतिम पवित्र स्नानाने झाली. जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्याला ६५ कोटींहून अधिक भाविकांनी भेट दिली, असे उत्तर प्रदेश सरकारने जाहीर केले. श्रद्धा, अध्यात्म, नाट्य, अनपेक्षित घटनांची रेलचेल आणि सोशल मीडियावरील चर्चांमुळे हा कुंभमेळा विशेष ठरला.

महाकुंभ हा हिंदू धर्मातील सर्वांत मोठा धार्मिक सोहळा मानला जातो. येथे शाही स्नान, विविध आखाड्यांचे दर्शन, गंगा–यमुना–सरस्वतीच्या त्रिवेणी संगमात स्नान आणि आध्यात्मिक प्रवचनांमध्ये कोट्यवधी भक्त सहभागी झाले. यावर्षी महाकुंभ सोशल मीडियावरही चर्चेचा विषय ठरला. विशेषतः काही व्यक्ती यामध्ये लक्षवेधी ठरल्या. मध्य प्रदेशातील १६ वर्षीय मोनालिसा 'मोनी' भोसले ही आपल्या डोळ्यांच्या भावनांमुळे आणि आकर्षक रूपामुळे सोशल मीडियावर प्रसिद्ध झाली. तिचे व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, मेळ्यातील गर्दी तिच्या मागे लागली, ज्यामुळे तिच्या सुरक्षिततेबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. काही अफवांमध्ये असा दावाही करण्यात आला की, तिने काही दिवसांत १० कोटी रुपये कमावले, मात्र तिने याचा इन्कार केला.

तसेच, आयआयटी बाबा' अभय सिंग, जे पूर्वी आयआयटी बॉम्बे येथे एरोस्पेस इंजिनीअर होते, ते आध्यात्मिक गुरु म्हणून समोर आले. त्यांचे विज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील समन्वयाबाबतचे विचार चर्चेचा विषय ठरले. त्यांनी मेळ्यातील पत्रकारांशी इंग्रजीत संवाद साधला आणि त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाबद्दल सांगितले, ज्यामुळे ते सोशल मीडियावर प्रसिद्ध झाले.

मेळ्यात कोट्यवधी लोकांची उपस्थिती असल्याने काही दुःखद घटना घडल्या. मौनी अमावस्येच्या दिवशी, जे हिंदू कॅलेंडरमधील सर्वात शुभ दिवसांपैकी एक मानले जाते, लाखो यात्रेकरू पवित्र स्नानासाठी संगमावर आले होते. या गर्दीत ३० जणांचा मृत्यू, तर ६० हून अधिक जण जखमी झाले. प्रयागराजहून परतणाऱ्या यात्रेकरूंमुळे नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर अत्यंत मोठी गर्दी जमली. फूटओव्हर ब्रिजवरून उतरणाऱ्या प्रवाशांमध्ये चेंगराचेंगरी झाली, ज्यात १८ जणांचा मृत्यू, तर डझनभर प्रवासी जखमी झाले. रेल्वे अधिकाऱ्यांनी ही दुर्घटना ओव्हरक्राउडिंग आणि घाईगडबडीमुळे झाल्याचे सांगितले. १९ जानेवारीला सेक्टर १९ मध्ये सिलेंडर स्फोट झाला, ज्यामुळे डझनभर तात्पुरते तंबू जळून खाक झाले. सुदैवाने, कोणतीही जीवितहानी झाली नाही. २५ जानेवारीला सेक्टर २ मध्ये दोन गाड्यांना आग लागली. एका कारमध्ये शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला.

महाकुंभदरम्यान घडलेल्या दुर्घटनांवरून विरोधकांनी उत्तर प्रदेश सरकारवर टीका केली. २९ जानेवारीच्या चेंगराचेंगरीनंतर, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी उत्तर प्रदेश सरकारवर निशाणा साधत महाकुंभला मृत्यू कुंभ' असे संबोधले. समाजवादी पक्ष आणि काँग्रेसने योगी आदित्यनाथ सरकारवर मृतांचा आकडा लपवल्याचा आरोप केला. कोट्यवधी लोकांनी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या त्रिवेणी संगमात स्नान केले. परंतु, यामुळे नदीतील पाण्याची गुणवत्ता बिघडल्याची चिंता व्यक्त करण्यात आली. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने एका अहवालात नमूद केले की, संगमातील पाण्यात विष्ठाजन्य बॅक्टेरिया आणि कोलिफॉर्मचे प्रमाण जास्त आहे. मात्र, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी विधानसभेत हे आरोप फेटाळले*आणि सांगितले की गंगेचे पाणी स्नान व आचमनासाठी पूर्णपणे सुरक्षित आहे.

'अनावश्यक प्रकल्प खपवून घेतले जाणार नाहीत' : सरदेसाई

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : फातोर्डाचे आमदार विजय सरदेसाई यांनी मडगाव नगरपरिषदेच्या निर्णयाविरोधात कठोर भूमिका घेत, फातोर्डा मतदारसंघात अनावश्यक कामांना मंजुरी दिली जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा दिला आहे.

स्थानिक रहिवाशांच्या तक्रारींचा उल्लेख करत सरदेसाई यांनी आरोप केला की, नगरपरिषदेतील काही अधिकारी हॉटेल व्यावसायिकांकडून लाच घेत आहेत आणि त्यांना गटारांमध्ये सांडपाणी टाकण्यास परवानगी देत आहेत.यासंदर्भात पालिकेने त्वरित चौकशी करावी आणि जबाबदार व्यक्तींची ओळख पटवावी, अशी मागणी त्यांनी केली.

बुधवारी सरदेसाई यांनी बोर्डा येथील आयटीआय प्रकल्पाची पाहणी करून अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. मी आधीच नगरपरिषदेला सांडपाणी व्यवस्थापनासंदर्भात सूचना दिल्या आहेत. गटारांमध्ये सांडपाणी सोडणाऱ्या घटकांची ओळख पटवून त्यांच्यावर कारवाई केली जावी. तसेच, आयटीआय प्रकल्पाच्या सांडपाण्याचे पुनर्वसन केवळ संपूर्ण तपासणी व सर्वेक्षणानंतरच शक्य होईल.त्यामुळे अपंगांसाठी पार्किंग आणि प्रवेश रॅम्प यांसारख्या समस्यांवर उपाय शोधण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

फातोर्डा मतदारसंघात अनधिकृत भेलपुरी स्टॉल्सच्या वाढत्या संख्येबद्दल सरदेसाई यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. महापालिकेने तातडीने कारवाई करून हे स्टॉल्स हटवावेत, अशी मागणी त्यांनी केली. सरदेसाई यांनी शीतगृह सुविधा नसलेल्या घाऊक मासळी बाजाराच्या पुनर्बांधणीला तीव्र विरोध दर्शवला. शीतगृह सुविधा ही बाजारासाठी अत्यावश्यक आहे. मात्र, दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण या मूलभूत सुविधेविना बाजाराचे पुनर्बांधणीचे काम हाती घेत आहे. जर सरकारने हा प्रकल्प पुढे रेटला, तर २० कोटी रुपयांचा दंड भरावा लागू शकतो, कारण या प्रकल्पासाठीचा निधी केंद्र सरकारकडून मंजूर करण्यात आला आहे असे सरदेसाई यांनी स्पष्ट केले. सरदेसाई यांनी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि आरोग्यमंत्री विश्वजित राणे यांच्यावरही निशाणा साधला. मुख्यमंत्री वैद्यकीय महाविद्यालयाबद्दल बोलतात, तर आरोग्यमंत्री नर्सिंग महाविद्यालयाबद्दल चर्चा करतात. त्यामुळे जिल्हा रुग्णालयासाठी नक्की काय योजना आहेत, हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी त्यांनी केली.

खराब रस्ता आणि प्रदूषणाविरोधात व्यापाऱ्यांचा निषेध

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २६ : उसगाव येथील व्यापारी संघटनेने खराब रस्त्यांमुळे होणाऱ्या समस्यांचा निषेध नोंदवण्यासाठी ४ मार्च रोजी तिस्क–उसगाव मार्केट बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रस्त्यांचे दुरुस्तीकरण, डांबरीकरण आणि धुळीच्या प्रदूषणावर उपाययोजना करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोप करत व्यापाऱ्यांनी हा निर्णय घेतला आहे.

व्यापारी संघटनेच्या बैठकीनंतर ही माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. तिस्क–उसगाव पीडीए मार्केटकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून, २०२२ च्या पंचायत निवडणुकीनंतर या रस्त्याचे डांबरीकरण करण्याची लेखी मागणी करण्यात आली होती. मात्र, दोन वर्षे उलटल्यानंतरही प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही. २०२४ मध्ये पुन्हा एकदा अधिकाऱ्यांकडे मागणी करूनही दुर्लक्ष करण्यात आल्याने व्यापाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

रस्त्याच्या दयनीय अवस्थेबरोबरच विकासकामांसाठी केलेल्या खोदकामामुळे मोठ्या प्रमाणात धुळीचे प्रदूषण होत आहे. याचा फटका बाजारातील व्यापाऱ्यांना बसत असून, धुळीमुळे दुकानदारांचे माल खराब होत आहेत. परिणामी, त्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. तसेच, सततच्या धुळीमुळे ग्राहक आणि दुकानदार यांना श्वसनासंबंधी आजार आणि सर्दी–खोकल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

पीडीए मार्केट रोड, अवंती नगर आणि कसाले परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण तब्बल आठ वर्षांपूर्वी करण्यात आले होते. त्यानंतर मात्र, कोणतीही देखभाल दुरुस्ती न केल्यामुळे आता हे सर्व अंतर्गत रस्तेही वाहतुकीसाठी धोकादायक झाले आहेत. दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

रस्ते दुरुस्तीसाठी वारंवार मागणी करूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने व्यापारी संघटनेने बाजारपेठ बंदचा निर्णय घेतला आहे. मात्र, तरीही सरकारने त्वरित कारवाई न केल्यास पुढील टप्प्यात वाहतूक रोखण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

बनावट निवास प्रमाणपत्रांबाबत कठोर कारवाईचे आश्वासन

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : बनावट कागदपत्रांच्या आधारे जारी करण्यात आलेल्या निवास प्रमाणपत्रांच्या प्रकरणांवर राज्य सरकार कठोर कारवाई करत असल्याची माहिती कायदा मंत्री आलेक्स सिक्वेरा यांनी दिली.

बेतालभाटी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मंत्री सिक्वेरा यांनी स्पष्ट केले की, अशा प्रकरणांमध्ये एफआयआर दाखल करण्यात आले असून त्यांनी फातोर्डा पोलीस ठाण्यात एका विशिष्ट प्रकरणाचा आढावा घेतला आहे. तसेच, साष्टी सब–रजिस्ट्रार कार्यालयात विवाह नोंदणीसाठी बनावट निवास प्रमाणपत्रांचा वापर होत असल्याच्या तक्रारी दक्षिण गोवा ॲडव्होकेट असोसिएशननेही दाखल केल्या आहेत. त्यांनी कबूल केले की या तपास प्रक्रियेत काही प्रमाणात विलंब होत असला, तरी सरकार यावर बारीक लक्ष ठेवून आहे. विविध तपास यंत्रणांचा समावेश असल्याने प्रक्रिया संथगतीने सुरू असली, तरी कठोर कारवाईसाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यावरण मंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळणाऱ्या सिक्वेरा यांनी कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन संदर्भात झालेल्या नव्या घडामोडींबाबत माहिती दिली. केंद्र सरकारने सीझेडएमपी २०११ ला मंजुरी दिली असली, तरी राज्य सरकारला त्यात काही विसंगती आढळून आल्या होत्या. त्यामुळे ही बाब केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती. तसेच, या मुद्द्यांवर पुनर्विचार करण्यासाठी राष्ट्रीय शाश्वत किनारी व्यवस्थापन केंद्र यांना निर्देश देण्यात आले आहेत.

कोस्टल झोन मॅनेजमेंट प्लॅन २०१९ लवकरात लवकर पूर्ण करण्याचा आग्रह राष्ट्रीय हरित न्यायाधिकणाने धरला आहे, परंतु त्याआधी आवश्यक सुधारणा करणे गरजेचे आहे, असे सिक्वेरा यांनी स्पष्ट केले.

नुवे मतदारसंघाचे आमदार असलेल्या सिक्वेरा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने सुरू असलेल्या महामार्ग विस्तारीकरणाबाबत माहिती दिली. पुढील दोन ते तीन महिन्यांत संपूर्ण रस्ता पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. मात्र, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण उपाय आधीच राबविण्यात आले आहेत. वाहतूक शिस्त सुधारण्यासाठी १५ इंचाचा मध्यभाग बांधण्यात आला असून असुरक्षित क्रॉसिंग टाळण्यासाठी प्लास्टिकचे बोलार्ड बदलण्यात आले आहेत. तसेच, दुभाजकामध्ये कोणतेही अंतर सोडण्यात आलेले नाही, ज्यामुळे पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढेल. हे काम नुवेम चर्चपर्यंत सुरू राहील, ज्यामुळे संपूर्ण परिसरातील रस्ते पायाभूत सुविधा अधिक सक्षम होतील, असे मंत्री सिक्वेरा यांनी सांगितले.

आग्वाद किल्ल्यावर उभारणार 'कौशल्य विकास केंद्र'

▶ – राज्य सरकार आणि आयएचसीएल यांचास सामंजस्य करार

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २६ : गोवा सरकारने भारतातील आघाडीच्या हॉस्पिटॅलिटी कंपनींपैकी एक असलेल्या इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड (आयएचसीएल) सोबत उत्तर गोव्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ आग्वाद किल्ल्यावर कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी सामंजस्य करार केला आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत आणि आयएचसीएलचे सीईओ पुनीत चटवाल यांच्या उपस्थितीत हा करार झाला. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करणे आणि रोजगाराच्या संधी वाढवणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. या कौशल्य विकास केंद्रात दरवर्षी १,००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यासाठी सुरुवातीला चार अभ्यासक्रम सुरू केले जातील. या केंद्राचा टप्प्याटप्प्याने विस्तार करून २०३० पर्यंत १०,००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. हा प्रकल्प एका वर्षात पूर्ण होईल आणि राज्यातील युवकांना हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात जागतिक दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण मिळेल, असे सावंत म्हणाले.

मुख्यमंत्री सावंत यांनी स्पष्ट केले की, हे केंद्र पर्यटन आणि आतिथ्य उद्योगात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर भर देईल. आम्ही राज्यातील तरुणांना योग्य कौशल्ये प्रदान करून त्यांना रोजगारक्षम बनवण्यासाठी वचनबद्ध आहोत, असे त्यांनी सांगितले. आयएचसीएलचे सीईओ पुनीत चटवाल यांनी गोवा सरकारसोबतच्या सहकार्याबद्दल आनंद व्यक्त केला. या भागीदारीद्वारे, आम्ही तरुणांना आतिथ्य क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि कौशल्ये प्रदान करण्यास कटिबद्ध आहोत, असे त्यांनी नमूद केले.

शॅक धोरणाच्या उल्लंघनप्रकरणी ९९ शॅकमालकांच्या सुनावणी प्रक्रियेला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २६ : गोवा पर्यटन विभागाने शॅक धोरणाच्या उल्लंघनासंदर्भात ९९ शॅकमालकांना बजावलेल्या नोटिसांवर सुनावणी प्रक्रिया सुरू केली आहे. यामध्ये मुख्यतः समुद्रकिनाऱ्यांवरील तात्पुरत्या शॅकच्या अनधिकृत सबलेटिंगवर कारवाई करण्यात आली आहे.

उत्तर गोव्यात ८० तर दक्षिण गोव्यात १९ शॅक मालकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. पर्यटन अधिकाऱ्यांनी केलेल्या अचानक तपासणीत ही उल्लंघने उघडकीस आली आहेत.

शॅक धोरणाच्या नियमांनुसार नोटिसा पाठवण्यात आल्या असून, झोपडी मालकांना आपले म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीची संधी देण्यात आली आहे. सदर सुनावणी या आठवड्यात सुरू झाली आहे, असे पर्यटन विभागाच्या सूत्रांनी स्पष्ट केले आहे . अधिकारी हे देखील तपास करत आहेत की सबलेटिंग गोव्यातील स्थानिक समुदायात होत आहे की बाहेरच्या लोकांना, विशेषतः उत्तर भारतीय व्यावसायिकांना.

उत्तर गोव्यातील सर्वाधिक उल्लंघने कळंगुट आणि कांदोळी मध्ये नोंदवली गेली आहेत. त्याशिवाय हणजूण , वझरवाडा, वागातोर, मोरजी हरमल मांद्रे आणि केरी या किनाऱ्यावरच्या काही शॅक्सही भाड्याने देण्यात आल्या आहेत.

दक्षिण गोव्यात कोलवा आणि बेतालभाटी, बाणावली, आरोशी, येथेही शॅकमालकांकडून नियमांचे झालेले उल्लंघन आढळून आले आहेत. शॅकच्या अनधिकृत सबलेटिंगमुळे निर्माण झालेल्या वादांमध्ये अनेक हिंसक घटना घडल्या असून, त्यात दोन खून प्रकरणे समोर आली आहेत.

डिसेंबर २०२४ मध्ये कळंगुट येथे झालेल्या हत्याकांडाने सबलेटिंग प्रकरणाचा पर्दाफाश केला. रात्री उशिरा झालेल्या वादानंतर आंध्र प्रदेशातील एका रहिवाशाची निर्घृण हत्या करण्यात आली होती. हा वाद एका जेवणाच्या ऑर्डरवरून वाढला आणि पहाटे १ वाजण्याच्या सुमारास गंभीर स्वरूप घेतले. याशिवाय, कलंगुटमधील दुसऱ्या घटनेत मुंबईतील एका पर्यटकावरही अमानुष हल्ला झाला. ताज्या प्रकरणांमध्ये २६ जानेवारी रोजी हरमल येथे सी लाउंज बीच शॅक'मध्ये वाद विकोपाला जाऊन स्थानिक व्यापारी अमर बांदेकर यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणात, पर्यटन विभागाने शॅक मालक मॅन्युएल फर्नांडिस यांच्यावर २५ लाख रुपयांचा दंड ठोठावून त्यांची सुरक्षा ठेव जप्त केली. संबंधित मालकाने हा निर्णय उच्च न्यायालयात आव्हान दिला असून, न्यायालयाने पर्यटन विभागाला वैयक्तिक सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत.

गोव्यातील पर्यटन व्यवसायासाठी शॅक धोरण अत्यंत महत्त्वाचे असून, त्याचे काटेकोर पालन न केल्यास पुढील काळात आणखी कठोर कारवाईची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

खुनाच्या गुन्ह्याचा फरार आरोपी ३५ वर्षांनी सापडला

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २६ : भाडेकरू पडताळणीचा मुद्दा पुन्हा एकदा कर्नाटकातील एका खून आरोपीला राय येथे अटक केल्यानंतर भाडेकरू पडताळणीचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत येऊ शकतो. तो गेल्या ३५ वर्षांपासून राजकोट–गुजरात येथे एका खून प्रकरणात फरार होता.

राजकोट–गुजरात येथे एका खून प्रकरणात वॉन्टेड असलेल्या आरोपीला सासष्टी येथे यशस्वीरित्या अटक केल्यानंतर गोवा पोलिसांनी त्याला अटक करणे ही एक महत्त्वाची कामगिरी असल्याचे म्हटले आहे.

कर्नाटक राज्यातील खालसा लक्ष्मीपूर येथील अरकेरा के येथील रहिवासी असलेला खून आरोपी बसप्पा हा तामिळनाडू, कर्नाटक आणि गोवा अशा राज्यांमध्ये फिरून अटक टाळत आहे. सूत्रांनी सांगितले की, आरोपी गेल्या जवळजवळ सात वर्षांपासून वेगवेगळ्या पोलिस ठाण्यांच्या हद्दीत गोव्यात राहत आहे.सूत्रांनी सांगितले की, आरोपी रायमध्ये रोजंदारी कामगार म्हणून उदरनिर्वाहासाठी काम करत आहे.सूत्रांनी सांगितले की, आरोपी रायमध्ये रोजंदारी कामगार म्हणून काम करत आहे.

गुजरातमधील राजकोट येथील लोधिका पोलिस स्टेशनकडून मिळालेल्या महत्त्वाच्या माहितीवरून मायना – कुड तरी पोलिस स्टेशनच्या पीआय अरुण गांवस देसाई यांच्या नेतृत्वाखालील पथकाने आरोपीला राय येथून अटक केली. १९९० मध्ये दाखल झालेल्या एका खून प्रकरणासाठी कलम ३०२ आयपीसी अंतर्गत गुन्हा क्रमांक ५३/१९९० मध्ये तो हवा होता.

स्थानिक गुप्तचर यंत्रणेच्या मदतीने, एएसआय उदय वेळीप यांच्या नेतृत्वाखालील पथकाने एचसी–५७५० सोमनाथ नाईक, पीसी–६६१४ अमरदीप चौधरी आणि पीसी–७४०३ धीरज नाईक यांच्यासह २४/०२/२०२५ रोजी राय येथे आरोपीला शोधून काढला आणि अटक केली. एसडीपीओ मडगाव शिवराम वैंगणकर आणि एसपी दक्षिण गोवा टिकम सिंग वर्मा यांच्या देखरेखीखाली ही कारवाई करण्यात आली.

तीन दशकांहून अधिक काळ कायद्यापासून दूर राहिलेल्या आरोपीला बीएनएसएस २०२३ च्या कलम ३५ अंतर्गत अटक करण्यात आली. अटकेनंतर, राजकोट पोलिसांना तातडीने माहिती देण्यात आली आणि आरोपीला पुढील तपास आणि कायदेशीर कारवाईसाठी त्यांच्याकडे सोपवण्यात आले.